**प्रेस नोट**

दिनांक १५-०७-२०२०

**आरोपी लोकसेवक शाकीर यासीन पटेल, वय ५० वर्ष पोहेकॉ/१६३४ पोलीस स्टेशन अंढेरा ता.देऊळगाव राजा जि.बुलडाणा यांनी लाचेची मागणी प्रकरणी गुन्हा दाखल.**

---

दिनांक १४.०७.२०२० रोजी तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा कडे तक्रार दिली होती की, यांतील ओलोस यांनी तक्रारदार यांना दारु विक्रीचा अैवध धंदा सुरु करण्यासाठी २०००/- हप्ता दयावा लागेल असे म्हणून ५००/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबावत तक्रार नोदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक १४.०७.२०२० रोजी आयोजीत केलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये पंच क्र.१ यांचे समक्ष आरोपी लोकसेवक शाकीर यासीन पटेल,पोहेकॉ/१६३४ पोलीस स्टेशन अंढेरा यांनी १५००/- घेतल्याची कबुली देवून उर्वरीत ५००/- लाचेची मागणी केल्याचे पडताळणी कार्यवाहीत निष्पन्न झाले आहे.

दि.१४.०७.२०२० रोजी आयोजीत केलेल्या पडताळणी कार्यवाही नंतर दिनांक १५.०७-.२०२० रोजी पोलीस स्टेशन अंढेरा येथे सापळा कार्यवाही आयोजीत केली असता आलोसे यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने लाच न स्विकारता निघुन जाण्याचे सांगीतले.

लोकसेवक श्री. शाकीर पटेल, पोहेकॉ/१६३४ पोलीस स्टेशन अंढेरा यांचे कृत्य कलम ७ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ संशोधन २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही मा.श्री.श्रीकांत धिवरे-पोलीस अधिक्षक, मा.पंजाबराव डोंगरदिवे-अपर पोलीस अधिक्षक, श्री. आर.एन.मळघणे-पोलीस उपअधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री.श्रीकांत निचळ-पोलीस निरीक्षक व कार्यवाही पथक यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक **०७२६२-२४२५४८** तसेच टोल फ्रि क्र.**१०६४** यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरों,बुलडाणा यांनी केले आहे.

**(श्रीकांत निचळ)**
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा

Scanned with CamScanner